# जागितक डेटा संरकझ्षण धोरण

**1 मे 2023 रोजी अपडेट केले**
**परझ्सझ्तावना**

CORNING[1] हे सझ्पेशालिटी गझ्लास व सिरॅमिकझ्स यांमधील जागतिक नेते आहेत. आम्ही आधारभूत घटक निर्माण करतो व बनवतो जझ्यायोगे कनझ्झझ्युमर इलेकझ्ट्रॉनिकझ्स, मोबाईल उतझ्सर्जन नियंतरझ्ण, टेलीकम्यूनिकेशनझ्स व जीवन विज न यांचझ्यासाठी उच च-तंतरझ्ज न परझ्णाल्या बनवणे शकझ्य होते. आमची वझ्यवसाय कार्ये करत असताना आम्ही आमचे कर्मचारी, अर्जदार, हंगामी कामगार, गरझ्राहक, पुरवठादार व अनझ्झय वझ्यवसाय भागीदार यांचझ्याशी संबंधित वैयक्तिक डेटा[2] गोळा व परझ्करझ्क्रया करतो.

सदझ्य धोरण (यापुढे "धोरण") वैयक्तिक डेटाचे संरकझ्षण करणझ्याबाबतचझ्या CORNING चझ्या बांधिलकझ्या निर्धारित करते. वैयक्तिक डेटाचे संरकझ्षण करणझ्यातील सर्वोच्च पातळीची खातरजमा करणझ्यासाठी CORNING ने वैयक्तिक डेटावर परझ्करझ्क्रया करणे व अशा डेटाची मुक्त हालचाल याबाबत नैसगरझ्क वझ्यक्तींचझ्या संरकझ्षणावरील युरोपीय संसद व कौनिझ्झसल यांचा चा विनियम (EU) 2016/679 (यापुढे "सर्वसाधारण डेटा संरकझ्षण विनियम" वा "GDPR" असे संदभरझ्त) दझ्वारे पुरवलेल्या मानकांशी सुसंगत केले आहे.

तझ्या वझ्यतिरिक्त, CORNING समूहादरम्यान हसझ्तांतरण होताना वैयक्तिक डेटाचे संरकझ्षण होत असल्याची खातरझी करणझ्यासाठी CORNING ने बंधनकारक कॉर्पोरेट नियम ("BCR") यांचा संच अमलात आणला आहे. ची अंमलबजावणी CORNING ईयू परझ्भागांकडून जगभर सिझ्थत अनझ्झय CORNING परझ्भागांकडे होणाऱ्या वैयक्तिक डेटा हसझ्तांतरणाला[3] पुरेसे संरकझ्षण देते. BCR ची ततझ्वेही GDPRशी सुसंगत आहेत. समूहादरम्यान वैयक्तिक डेटाचे आंतरराषझ्टरझीय हसझ्तांतरण कायदेशीर करणझ्यावझ्यतिरिक्त, BCR जगभरात डेटा संरकझ्षण अनुपालनासाठी साततझ्यपूर्ण व परिणामकारक दृष्टिकोन लागू करणझ्यास CORNING ला सक षम करतात. CORNING जागतिकरितझ्या व जेथे CORNING वैयक्तिक डेटावर परझ्करझ्क्रया करते अशा सर्व केसेसमधझ्ये BCR लागू करते. BCR बाबत अधिक जाणणझ्यासाठी, कृपया येथे भेट दझ्या: http://www.corning.com/worldwide/en/privacy-policy/binding-corporate-rules.html

डेटा संरकझ्षण धोरणे व कार्यपदझ्धती, कर्मचारी परझ्शिकझ्षण आणि जागतिक डेटा संरकझ्षण अनुपालन सुलभ करणझ्यासाठी CORNING ने गोपनीयता कार्यालयही (जझ्याला "Corning परझ्ायवझ्हसी ऑकरझ्फस" वा "CPO" असे संदभरझ्त केले जाते) व डेटा संरकझ्षण मानकांचझ्या अनुपालनावर वरचेवर देखरेख ठेवणझ्यासाठी कार्यक्रम सझ्थापन केला आहे.

CORNING परझ्तझ्येक डेटा विषयवझ्यक्तीला सदझ्य धोरण सहज उपलबझ्ध करून देणझ्यास कटिबद्ध आहे. या उद् ेशाने, या धोरणाची सदझ्य आवृतझ्ती CORNING चझ्या इनझ्झट्रानेटवर व CORNING चझ्या बाह्य वेबसाईटवर परझ्दशरझ्त करणझ्यात आली आहे.

## I. धोरणाचा उद्देश

या धोरणाचा उद्देश आहे:

i. CORNING वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करते तेव्हा लागू करते त्या मानकांचे वर्णन करणे
ii. CORNING ने एक समूह म्हणून वैयक्तिक डेटा संरक्षणासंबंधी अमलात आणलेल्या प्रशासन कृतींचा खुलासा करणे.
iii. ज्यांच्या वैयक्तिक डेटावर प्रक्रिया केली जात आहे अशा डेटा विषयव्यक्तींचे हक्क व हे हक्क ते कसे बजावू शकतात यांचे विवरण देणे.

## II. धोरणाची व्याप्ती

[1] "CORNING" (वा "आम्ही," "आमचे") – याचा अर्थ असेल Corning Incorporated, एक न्यू यॉर्क कॉर्पोरेशन, ज्यांचे मुख्यालय Corning, NY, USA, येथे आहे व Corning Incorporated यांची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मालकी वा नियंत्रण असलेल्या त्यांच्या जगातील सर्व उपकंपन्या. इथे वापरल्यानुसार, प्रभागाची मालकी वा नियंत्रण यासाठी त्या प्रभागाचे डायरेक्टर्स, मॅनेजर्स, सामान्य भागीदार वा समान अधिकाऱ्यांची निवडणूक वा नियुक्ती करण्यासाठी मतदानाची वा निवडणुकीसाठीच्या अन्य समान शक्तीची पन्नास टक्क्यांहून (50%) अधिक स्टॉक वा अन्य स्वारस्य यांची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मालकी आवश्यक आहे. हे एकत्रित कॉर्पोरेट कुटुंब येथे काही वेळा "CORNING समूह" असेही संदर्भित करण्यात आले आहे.

[2] "वैयक्तिक डेटा" याचा अर्थ असेल ओळख पटवलेल्या किंवा पटवू शकणाऱ्या नैसर्गिक व्यक्ती ('डेटा विषयव्यक्ती) बाबतची कोणतीही माहिती; ओळखण्याजोगी व्यक्ती म्हणजे जिला ओळखता येऊ शकते, विशेषकरून एका ओळख क्रमांकाचा किंवा त्या व्यक्तीविशिष्ट असलेल्या शारीरिक, शरीरशास्त्रविषयक, मानसिक, आर्थिक, सांस्कृतिक किंवा सामाजिक ओळख यांसारखा एक किंवा अधिक घटकांचा संदर्भ मिळाल्याने जिची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष ओळख मिळू शकते अशी व्यक्ती. जर आणि ज्या प्रमाणात लागू आहेत ते राष्ट्रीय डेटा संरक्षण कायदे सुद्धा ओळख पटवलेली वा ओळख पटवण्यायोग्य कायदेशीर प्रभाग यांसदर्भातील माहितीचे संरक्षण करत असतील, तर "वैयक्तिक डेटा" या संज्ञेत अशा माहितीचाही समावेश असेल.

[3] "डेटा हस्तांतरण" याचा अर्थ कोणत्याही प्रभागाकडून अन्य प्रभागाकडे हस्तांतरण होणारा कोणताही वैयक्तिक डेटा असा असेल. हस्तांतरण कोणत्याही दळणवळणाद्वारे केले जाऊ शकते, डेटाबेसमधील दूरस्थ प्रवेशासह नेटवर्कद्वारे वैयक्तिक डेटा कॉपी, हस्तांतरित वा उघड करणे, किंवा एका माध्यमातून दुसऱ्यात हस्तांतरण करणे, मग माध्यमाचे स्वरूप काहीही असो (उदारहणार्थ संगणक हार्ड डिस्कवरून सर्व्हरवर).

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

हे धोरण [4]कोणत्याही CORNING प्रभागाने किंवा त्याच्या वतीने प्रक्रिया करायचा सर्व वैयक्तिक डेटा, मग असा वैयक्तिक डेटा कोणत्याही स्वरूपात असला तरी, (उदा., इलेक्ट्रॉनिक नोंदी, कागदी फायली, व्हिडिओ रेकॉर्डिंग्ज, इ.) यांना लागू होते.

CORNING प्रभाग, सर्व CORNING कर्मचारी आणि हंगामी कामगार यांनी या धोरणाचे अनुपालन करणे आवश्यक आहे. GDPR व्यतिरिक्त, प्रत्येक CORNING प्रभाग लागू स्थानिक डेटा संरक्षण आवश्यकतांचे अनुपालन करतो.

त्याव्यतिरिक्त, सर्व पुरवठादार[5] व, लागू असेल त्या प्रमाणात, ज्यांच्याकडे CORNING ने वा त्यांच्या वतीने वैयक्तिक डेटा सुपुर्द केला आहे असे कोणतेही तृतीय पक्ष[6] यांनी किमान या धोरणात समाविष्ट असलेल्या वैयक्तिक डेटा संरक्षण मानकांच्या समकक्ष मानके लागू असल्याबाबत समाधानकारक खात्री दिली पाहिजे.

## III. सर्वसामान्य नियम

CORNING तिचे कर्मचारी, अर्जदार, हंगामी कामगार, ग्राहक, पुरवठादार, व्यवसाय भागीदार व ज्यांच्याशी ती संवाद साधते अशा इतरांनी सुपुर्द केलेल्या वैयक्तिक डेटाचे संरक्षण व सुरक्षित जपणूक बीसीआर व या धोरणामध्ये नमूद केलेल्या तत्त्वांनुसार करण्यास बांधील आहे.

CORNING ची डेटा संरक्षण पद्धती व कार्यक्रम CORNING ची मूल्ये व लागू असलेले कायदे व नियमने याच्याशी सुसंगत असतात. CORNING तिचे पुरवठादार व व्यवसाय भागीदार यांनी त्यांना सुपुर्द केलेल्या वैयक्तिक डेटासाठी डेटा संरक्षण पद्धती किमान CORNING च्या BCR व या धोरणामध्ये वर्णन केल्याइतकी कडक असणे आवश्यक करते.

## IV. डेटा संरक्षण तत्त्वे

### वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यासाठी कायदेशीर आधार

CORNING वैयक्तिक डेटा गोळा व त्यावर प्रक्रिया करतो फक्त जर:

- डेटा विषयव्यक्तीने एक वा अधिक विशिष्ट उद्देशांसाठी तिच्या वा त्याच्या वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यास[7] संमती दिली असेल; वा
- डेटा विषयव्यक्ती पक्ष असलेल्या कंत्राटासाठी किंवा कंत्राट करण्याआधी डेटा सब्जेक्टने विनंती केलेल्या पायऱ्या अनुसरण्यासाठी प्रक्रिया करणे आवश्यक असते; किंवा
- CORNING च्या कायदेशीर दायित्वाचे अनुपालन करण्यासाठी प्रक्रिया करणे आवश्यक असते; किंवा
- डेटा विषयव्यक्तीच्या वा अन्य नैसर्गिक व्यक्तीच्या जीवनावश्यक स्वारस्यांचे रक्षण करण्यासाठी प्रक्रिया करणे आवश्यक असते; किंवा
- लोकहितासाठी केलेल्या कामासाठी किंवा CORNING ला किंवा वैयक्तिक डेटा उघड केला जातो त्या तृतीय पक्षाला दिलेल्या अधिकृत अधिकाराचे कार्यान्वयन करण्यासाठी प्रक्रिया करणे आवश्यक असते; किंवा
- जेथे अशी स्वारस्ये संरक्षण आवश्यक असलेल्या डेटा विषयव्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे व स्वातंत्र्याचे स्वारस्य यांनी अतिक्रमित होतात, खासकरून अशी डेटा विषयव्यक्ती बालक असते तेथे वगळता, CORNING वा ज्याच्याकडे वैयक्तिक डेटा उघड करण्यात आला आहे असा वा असे तृतीय पक्ष नियंत्रकाच्या भूमिकेत असताना कायदेशीर स्वारस्यांच्या जपणुकीसाठी[8] प्रक्रिया करणे आवश्यक असते.

### वैयक्तिक डेटाच्या खास प्रवर्गांवर प्रक्रिया करण्यासाठी कायदेशीर आधार[9]

CORNING वैयक्तिक डेटाच्या खास प्रवर्गांवर प्रक्रिया करत नाही जोपर्यंत:

[4] “प्रक्रिया करणे” याचा अर्थ म्हणजे गोळा करणे, रेकॉर्ड करणे, व्यवस्थापन, गठण, साठवण, स्वीकृती वा बदल, पुनर्प्राप्ती, सल्लामसलत, वहन, विघटन यांद्वारा प्रगटीकरण किंवा अन्य प्रकारे उपलब्ध केले जाणे, सुरचित करणे वा एकत्रीकरण, मर्यादित करणे, काढून टाकणे वा नष्ट करणे यांसहित वैयक्तिक डेटावर केले गेले असे स्वयंचलितरित्या असलेले वा नसलेले कोणतेही कार्य असा असेल.

[5] “पुरवठादार” याचा अर्थ Corning ने त्यांच्या बहुसंख्य प्रक्रियाकर्त्यांना संदर्भित करण्यासाठी वापरलेली संज्ञा असा असेल. पुरवठादार हा एक कंत्राटाखालील प्रभाग आहे जो Corning च्या निर्देशांनुसार वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करू शकेल, उदाहरणार्थ पेरोल पुरवठादार.

[6] “तृतीय पक्ष” याचा अर्थ डेटा विषयव्यक्ती सोडून एक नैसर्गिक वा कायदेशीर व्यक्ती, सार्वजनिक प्राधिकरण, एजन्सी वा बॉडी, नियंत्रक, प्रक्रियाकर्ता व नियंत्रक वा प्रक्रियाकर्ता यांच्या थेट अधिपत्याखाली डेटावर प्रक्रिया करण्यास प्राधीकृत व्यक्ती, असा असेल.

[7] या धोरणात अन्यत्र व्याख्या न केलेल्या सर्व कॅपिटल संज्ञांना GDPRमध्ये दिलेले अर्थ लागू होतात.

[8] "नियंत्रक" याचा अर्थ नैसर्गिक वा कायदेशीर व्यक्ती, सार्वजनिक प्राधीकरण, एजन्सी वा अन्य कोणतीही बॉडी जी एकटी वा इतरांसह एकत्रितपणे वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्याचे उद्देश वा साधने ठरवतात.

[9] “वैयक्तिक डेटाचे खास प्रवर्ग” याचा अर्थ जातीय वा वांशिक मूळ, राजकीय मते, धार्मिक वा तात्विक विश्वास वा कर्मचारी-संघटना सदस्यत्व उघड करणारा, जैविक डेटा, बायोमेट्रिक डेटा, आरोगझ्याशी निगडित डेटा, नैसगरईक वझ्यक्तीचे लैंगिक जीवन वा लैंगिक कल याचझ्याशी निगडित डेटा असा आहे.

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

– डेटा विषयव्यक्तीने अशा वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यासाठी त्याची/तिची निःसंदिग्ध संमती दिली आहे (लागू कायदे प्रतिबंधित करत असतील तेथे वगळता); किंवा
– रोजगार कायदा क्षेत्रात नियंत्रक म्हणून काम करत असलेल्या CORNING प्रभागाला बंधने व विशिष्ट हक्क यांचे अनुपालन करण्याच्या उद्देशांनी संघटना वा राष्ट्रीय कायदा यांनी प्राधिकृत केले असेल वा एकत्रित करार पुरेशा संरक्षक उपाययोजना पुरवत असेल तेथवर असे प्रक्रिया करणे आवश्यक आहे; किंवा
– प्रक्रिया करणे त्या डेटा विषयव्यक्तीच्या जीवनावश्यक हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी किंवा जेथे डेटा विषयव्यक्ती शारीरिकरीत्या वा कायदेशीररीत्या संमती देण्यास असमर्थ आहे तेथे अन्य व्यक्तीचे जीवनावश्यक हितसंबंध रक्षिण्यासाठी; किंवा
– वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे कायदेशीर दाव्यांचा अंमल, बचाव किंवा स्थापना करण्यासाठी आवश्यक आहे; किंवा
– प्रक्रिया करणे अशा वैयक्तिक डेटाखास प्रवर्गांशी संबंधित आहे जो डेटा विषयव्यक्तीने जाहीरपणे सार्वजनिक केला आहे; किंवा
– प्रक्रिया करणे दीर्घ लोकहितासाठी आवश्यक आहे;
– प्रक्रिया करणे कर्मचाऱ्याच्या कार्य करण्याच्या क्षमतेच्या मूल्यमापनासाठी आवश्यक आहे;
– प्रक्रिया करणे लोकहितार्थ (GDPRच्या कलम 89 ला अनुसरून) अभिलेखीकरणाच्या उद्देशांसाठी, वैज्ञानिक वा ऐतिहासिक संशोधनाच्या उद्देशांसाठी वा सांख्यिकीकरणाच्या उद्देशांसाठी आवश्यक आहे.

CORNING गुन्हे, गुन्हेगारी अटक वा सुरक्षितता मार्ग यासंबंधातील वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करेल, ज्यांच्या बाबतीत वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे, लागू असेल तेथे, अधिकृत प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली, व लागू राष्ट्रीय कायद्यांनी पुरवलेल्या विशिष्ट सुरक्षा उपायांचे अनुपालन करून असेल. त्या व्यतिरिक्त, स्थानिक डेटा संरक्षण कायदे राष्ट्रीय ओळख क्रमांकांवर प्रक्रिया करण्यास विशिष्ट मर्यादा पुरवू शकतात.

**उद्देश मर्यादा**

CORNING वैयक्तिक डेटावर निर्धारित, निःसंदिग्ध व कायदेशीर उद्देशांसाठी प्रक्रिया करते व या उद्देशांशी सुसंगत नसलेल्या प्रकारे त्याच्यावर पुढे प्रक्रिया करत नाही. डेटा विषयव्यक्तीची पूर्वसंमती प्राप्त केली आहे का; प्रक्रिया करणे कायदेशीर दायित्वावर आधारित आहे का; किंवा प्रक्रिया करण्याचा नवीन उद्देश वैयक्तिक डेटा सुरुवातीला ज्या उद्देशाने गोळा व प्रक्रिया केला गेला त्याच्याशी सुसंगत मानला जाऊ शकतो का याची खातरजमा केल्याशिवाय CORNING वैयक्तिक डेटावर त्यापुढील उद्देशांसाठी प्रक्रिया करत नाही.

**डेटा गुणवत्ता व किमानीकरण**

CORNING वैयक्तिक डेटा तिच्या वैध व्यावसायिक स्वारस्यांसाठी आवश्यक तितका, व व्यक्तींचे हक्क लक्षात घेऊन उचित व कायदेशीर मार्गाने गोळा व प्रक्रिया करते.

CORNING वैयक्तिक डेटा गोळा करणे तिच्या व्यावसायिक उद्देशांसाठी सुयोग्य व आवश्यक मर्यादेत ठेवते. CORNING वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करताना तो पुरेसा, सुसंगत असेल व ज्या उद्देशांसाठी गोळा केला व/वा पुढे प्रक्रिया केला गेला त्यासंदर्भात खूप अधिक नसेल याची खातरजमा करते. गोळा करण्याचे कारण व लागू नियमने यांवर अवलंबून, विशिष्ट उद्देशासाठी गोळा केलेल्या वैयक्तिक डेटाच्या विशिष्ट प्रकारांमध्ये बदल होऊ शकतो. CORNING कडे वैयक्तिक डेटा खूप जास्त प्रमाणात व गोळा करण्याच्या इच्छित उद्देशाशी विसंगत, किंवा डेटा विषयव्यक्तीला पुरवलेल्या माहितीच्या आवाक्याबाहेर प्राप्त झाल्यास, CORNING, योग्य असल्यानुसार, पाठवणाऱ्याकडून वैयक्तिक डेटाचे आणखी खूप जास्त प्रमाणात व विसंगत पारेषण रोखण्यासाठी सुयोग्य पावले उचलेल, व अशा विसंगत व खूप जास्त प्रमाणातील वैयक्तिक डेटावर पुढे प्रक्रिया होऊ नये म्हणून योग्य मार्ग (नष्ट करणे यासारखे) वापरेल.

**अचूक व अद्ययावत**

CORNING प्रक्रिया करत असलेला वैयक्तिक डेटा अचूक असल्याची व आवश्यक तेथे दुरुस्त करून अद्ययावत ठेवला खात्री करण्यासाठी सुयोग्य पावले उचलते. CORNING योग्य असेल त्यानुसार, गोळा करण्याच्या किंवा पुढे प्रक्रिया करण्याच्या उद्देशांसंदर्भात चूक व अपूर्ण असलेला वैयक्तिक डेटा खोडला गेला किंवा सुधारला असल्याची खात्री करण्यासाठी सुयोग्य पावले उचलेल. डेटा विषयव्यक्ती खाली दिलेल्यानुसार योग्य त्या विभागात दर्शवलेल्या CORNING संपर्क बिंदूंशी संपर्क साधू शकतात. शक्य तेथे, CORNING व्यक्तींना त्यांच्या वैयक्तिक डेटात प्रवेश, दुरुस्ती आणि/किंवा अद्यतन यांसाठी स्वयंचलित मार्गही पुरवेल.

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

**सुयोग्य डेटा राखणे**

CORNING वैयक्तिक डेटा कायदेशीर व व्यावसायिक रीटेन्शन आवश्यकतांशी सुसंगत अशा स्वरूपात ताब्यात ठेवते जे ओळख अनुमत करते, आणि वैयक्तिक डेटा ज्या उद्देशाने गोळा केला वा त्यावर प्रक्रिया केली त्यासाठी तो यापुढे आवश्यक नसल्यानंतर तो साठवत नाही. खासकरून, CORNING वैयक्तिक डेटा नष्ट करण्यासाठी वास्तविक पावले उचलते जेव्हा (i) गोळा करण्याच्या इच्छित उद्देशासाठी तो यापुढे आवश्यक नाही, आणि/किंवा (ii) लागू कायद्यानुसार (असल्यास) अनुमत कमाल जतन कालावधी उलटला आहे.

**स्वयंचलित वैयक्तिक निर्णय**

प्रत्येक डेटा विषयव्यक्तीला त्याच्याशी संबंधित कायदेशीर परिणाम निर्माण होतील वा त्याच्यावर लक्षणीय परिणाम होईल व जो प्रोफायलिंग सहित लागू डेटा संरक्षण नियमांनी पुरवलेल्या स्थितींमध्ये त्याच्या विशिष्ट वैयक्तिक मुद्द्यांच्या तपासणीसाठी असलेल्या वैयक्तिक डेटावर केवळ स्वयंचलित प्रक्रिया केल्याने झाला आहे अशा निर्णयाला तोंड न द्यावे लागण्याचा हक्क आहे याची खात्री करण्यासाठी CORNING सुयोग्य पावले उचलते (म्हणजे, CORNING व डेटा विषयव्यक्ती यांमध्ये कंत्राट करण्यासाठी वा त्याच्या परफॉर्मन्ससाठी असा निर्णय आवश्यक असल्यास, वा ज्यात CORNING विषयव्यक्ती आहे अशा डेटा संरक्षणासंबंधीच्या लागू कायद्यान्वये प्राधीकृत असल्यास वा डेटा विषयव्यक्तीच्या निःसंदिग्ध संमतीवर आधारित असल्यास ते वगळता).

**पारदर्शकता व माहिती हक्क**

पारदर्शकतेच्या तत्वाबरहुकूम, डेटा विषयव्यक्तींना पुरवलेली माहिती डेटा विषयव्यक्तींसाठी सुगम व प्रवेशप्राप्त असल्याची खात्री Corning करते. ही माहिती संक्षिप्त व सहज प्रवेशप्राप्त स्वरूपात, स्पष्ट व सोपी भाषा वापरून सादर केली जाते.

डेटा विषयव्यक्तीकडे आधीच ती असेल ते वगळता, CORNING डेटा विषयव्यक्तीला किमान खालील माहिती पुरवते:

– नियंत्रकाची व, असल्यास, नियंत्रकाच्या प्रतिनिधीची ओळख व संपर्क तपशील व, योग्य तेव्हा, EEA बाहेर नियंत्रक स्थित असलेले ठिकाण;
– डेटा संरक्षण अधिकारी (GDPR वा अन्य लागू ईयू डेटा संरक्षण कायदे यांच्या अनुपालनानुसार नियुक्त केला गेलेला, लागू असेल तेथे) याचे संपर्क तपशील;
– वैयक्तिक डेटा ज्यासाठी आहे तो प्रक्रिया करण्याचे उद्देश, तसेच प्रक्रिया करण्यासाठी कायदेशीर पाया;
– जेथे प्रक्रिया करणे वैध स्वारस्यावर आधारित आहे, तेथे नियंत्रकाने वा तृतीय पक्षाने जपलेली वैध स्वारस्ये
– प्राप्तकर्ते[10] वा वैयक्तिक डेटा प्राप्तकर्त्यांचा प्रवर्ग; लागू असेल तेथे, वैयक्तिक डेटाचे तृतीय देशात हस्तांतरण, व संबंधित सुरक्षा उपायांचे तपशील, युरोपियन कमिशनद्वारा पुरेसे असल्याचा निर्णय अस्तित्वात आहे वा नाही, व त्यांची प्रत मिळवण्याची साधने वा ते कोठे उपलब्ध केले गेले आहेत याच्या समावेशासह
– कोणतीही अधिक माहिती उदाहरणार्थ:
  - वैयक्तिक डेटा साठवला जाण्याचा कालावधी, वा हे शक्य नसल्यास तो कालावधी ठरवण्यासाठी वापरलेले निकष;
  - वैयक्तिक डेटाची तरतूद वैधानिक आहे की कंत्राटान्वये, डेटा विषयव्यक्तीला वैयक्तिक डेटा पुरवणे बंधनकारक आहे का व असा डेटा पुरवण्यात अपयश आल्यास संभाव्य परिणामांबाबत;
  - स्वयंचलित वैयक्तिक निर्णय घेण्याचे (असल्यास) अस्तित्व, प्रोफायलिंग सहित, त्यातील तर्कशास्त्राच्या अर्थपूर्ण माहितीसहित, तसेच डेटा विषयव्यक्तीसाठी अशा प्रक्रियेचे महत्व व संभाव्य परिणामांसहित;
  - नियंत्रकाकडून वैयक्तिक डेटात प्रवेश, दुरुस्ती वा काढून टाकण्याच्या वा डेटा विषयव्यक्तीसंबंधी प्रक्रिया करणे निर्बंधित करण्याच्या वा प्रक्रिया करण्याला आक्षेप घेण्याच्या तसेच वैयक्तिक डेटाच्या डेटा पोर्टेबलिटीच्या हक्काचे अस्तित्व;
  - जेथे प्रक्रिया करणे संमतीवर आधारित आहे तेथे मागे घेण्याआधीच्या संमतीवर आधारित प्रक्रिया करण्याच्या कायदेशीरपणावर परिणाम न होता संमती कधीही मागे घेण्याचा हक्क;
  - डेटा संरक्षण नियमांचा भंग होत असल्याच्या घटनेत पर्यवेक्षक प्राधीकरणाकडे[11] उल्लंघन दाखल करण्याचा हक्क.

[10] "प्राप्तकर्ता" याचा अर्थ नैसर्गिक किंवा कायदेशीर व्यक्ती, सार्वजनिक प्राधिकरण, एजन्सी किंवा अन्य कोणतीही बॉडी जिला डेटा उघड केला जातो, तृतीय पक्ष असो किंवा नसो; तथापि, प्राधिकरणे ज्यांना विशिष्ट चौकशीच्या चौकटीत डेटा प्राप्त होईल, त्यांना प्राप्तकर्ते मानले जाणार नाही.

[11] "पर्यवेक्षक प्राधीकरण" याचा अर्थ असेल एक स्वतंत्र संस्था जिच्याकडे याबाबतचे नियंत्रण आहे: (i) तिच्या कार्यक्षेत्रातील वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यावर देखरेख ठेवणे, (ii) वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यासंबंधी कायदेशीर व प्रशासकीय उपाययोजनांबाबत सक्षम बॉडींना सल्ला पुरवणे व (iii) डेटा विषयव्यक्तींनी तयांचया डेटा संरकषण हककांचया संरकषणासंबंधी केलेल या तक्रारींची सुनावणी करणे.

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

त्याव्यतिरिक्त Corning च्या BCR खालील बांधिलक्यांनुसार माहिती सूचनेत Corning डेटा विषयव्यक्तींना याचीही माहिती देईल की डेटा विषयव्यक्तीचे त्याच्या वा तिच्या वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यासंबंधात कोणतेही नुकसान झाल्यास, डेटा विषयव्यक्तीला दाद मागण्याचा व, सुयोग्य तेथे, सक्षम न्यायालयीन वा पर्यवेक्षक प्राधीकरणाकडून आदेशान्वये वा वापरल्यास अंतर्गत Corning तक्रार यंत्रणेने ठरवल्यानुसार भरपाई मिळवण्याचा हक्क आहे. (या विशिष्ट हक्कांबाबत अधिक जाणण्यासाठी BCR ची कलमे 5.4, 6.3 व 6.4 पाहा.

डेटा विषयव्यक्तींकडून वैयक्तिक डेटा थेट मिळवलेला नसेल तेथे, CORNING डेटा विषयव्यक्तींना संबंधित वैयक्तिक डेटाचे प्रवर्ग व हा वैयक्तिक डेटा उगम झाला त्या स्त्रोतासंबधी, व लागू असल्यास, तो सार्वजनिकरित्या प्रवेश असणाऱ्या स्त्रोतांपासून आला का यासंबधी माहिती पुरवते. अशा घटनेत, वरील माहिती पुरवली जाते:

a. वैयक्तिक डेटा मिळवल्यानंतर वाजवी कालावधीत, पण जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत, वैयक्तिक डेटा प्रक्रिया करण्यात आलेल्या विशिष्ट परिस्थितींबाबत विचार करून;
b. वैयक्तिक डेटा जर डेटा विषयव्यक्तीशी संप्रेषणासाठी वापरायचा असल्यास, उशिरात उशिरा डेटा विषयव्यक्तीशी पहिल्या संप्रेषणाच्या वेळी; किंवा
c. किंवा तृतीय पक्षाकडे उघड होण्याच्या शक्यतेत, वैयक्तिक डेटा सर्वप्रथम उघड होण्याच्या तारखेनंतर नाही, अशा वेळी.

डेटा विषयव्यक्तींना माहिती कळवण्याचे बंधन लागू होणार नाही जर (i)डेटा विषयव्यक्तीकडे माहिती आधीच आहे; वा (ii) यासाठी प्रमाणाबाहेर प्रयत्न लागेल; वा (iii) असे रेकॉर्डिंग वा प्रकटीकरण नियंत्रक अधीन आहे अशा कायद्याने अत्यावश्यक आहे व जो डेटा विषयव्यक्तीच्या वैध स्वारस्याचे संरक्षण करण्यासाठी योग्य उपाय पुरवतो; वा (iv) गुप्ततेच्या वैधानिक दायित्वासहित ईयू वा राष्ट्रीय कायद्यांच्या दायित्वाच्या अधीन वैयक्तिक डेटा गोपनीय राहिलाच पाहिजे.

**प्रवेश, दुरुस्ती, काढून टाकणे, प्रक्रिया करणे निर्बंधित करण्याचा हक्क, प्रक्रिया करण्याला व डेटा पोर्टेबलिटीला आक्षेप घेण्याचा हक्क**

डेटा विषयव्यक्तींच्या हक्कांविषयी विनंत्या प्राप्त करणे व त्यांना प्रतिसाद देणे यासाठी पुरेसे मार्ग Corning देऊ करते.

प्रत्येक डेटा प्रयुक्ताला याचा हक्क आहे:

– मर्यादेशिवाय, वाजवी कालावधींदरम्यान, व मर्यादेबाहेर उशीर वा खर्च न करता, व लागू असेल तेथे, राष्ट्रीय कायद्यांबरहुकूम CORNING कडून हे प्राप्त करणे:
    ▪ डेटा विषयव्यक्तीसंबंधी वैयक्तिक डेटावर प्रक्रिया केली जात आहे वा नाही याची पुष्टी,
    ▪ तसे असल्यास, किमान प्रक्रिया करण्याच्या उद्देशांची, संबंधित डेटाचे प्रवर्ग व प्राप्तकर्ते वा प्राप्तकर्त्यांचे प्रवर्ग ज्यांना वैयक्तिक डेटा उघड केला आहे याची माहिती; शक्य तेथे वैयक्तिक डेटा साठवला जाण्याचा कालावधी, वा हे शक्य नसल्यास तो कालावधी ठरवण्यासाठी वापरलेले निकष; CORNING कडून वैयक्तिक डेटात प्रवेश, दुरुस्ती वा काढून टाकण्याच्या वा डेटा विषयव्यक्तीसंबंधी प्रक्रिया करणे निर्बंधित करण्याच्या वा प्रक्रिया करण्याला आक्षेप घेण्याच्या हक्काचे अस्तित्व; पर्यवेक्षक प्राधीकरणाकडे तक्रार दाखल करण्याचा हक्क, स्त्रोताबातत कोणतीही उपलब्ध माहिती (वैयक्तिक डेटा जेंव्हा डेटा विषयव्यक्तीकडून गोळा केला नसेल तेंव्हा); स्वयंचलित निर्णयशक्तीचे अस्तित्व, प्रोफायलिंग सहित, त्यातील तर्कशास्त्राच्या अर्थपूर्ण माहितीसहित, तसेच डेटा विषयव्यक्तीसाठी अशा प्रक्रियेचे महत्व व संभाव्य परिणामांसहित;
    ▪ जेथे वैयक्तिक डेटाचे तृतीय देशात[12] हस्तांतरण होते, तेथे हस्तांतरणासाठी वापरलेल्या सुयोग्य सुरक्षा उपायांबाबत माहिती; प्रक्रिया केली जात असलेल्या वैयक्तिक डेटासंबंधी डेटा सब्जेक्टला सुगम स्वरूपात दळणवळण व कोणतीही उपलब्ध माहिती, स्त्रोतांसह;
– मर्यादेबाहेर उशीराशिवाय, CORNING कडून त्याच्या वा तिच्या संबंधित चुकीच्या स्वरूपातील वैयक्तिक डेटाची सुधारणा किंवा काढून टाकणे, वैयक्तिक डेटा काढून टाकणे किंवा प्रक्रिया करणे निर्बंधित करणे प्राप्त करणे;
– त्याच्या वा तिच्या डेटा पोर्टेबलिटीच्या हक्काचे कार्यान्वयन करणे व त्याने वा तिने CORNING ला पुरवलेला त्याच्या वा तिच्या संबंधित वैयक्तिक डेटा व्यवस्थितपणे आरेखित, सामान्यपणे वापरल्या जाणाऱ्या व यंत्राद्वारा वाचण्याजोग्या स्वरूपात CORNING कडून प्राप्त करण्याचा हक्क प्राप्त करणे;
– वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्याला (प्रक्रिया करणे CORNING च्या कायदेशीर स्वारस्यावर आधारलेले असताना) डेटा प्रयुक्ताच्या विशिष्ट परिस्थितीशी संबंधित, भाग पाडणाऱ्या कायदेशीर आधारावर कोणत्याही वेळी आक्षेप घेणे;

[12] **"तृतीय देश"** याचा अर्थ युरोपीय आर्थिक क्षेत्र (EEA) बाहेरील देश.

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

– थेट मार्केटिंगच्या उद्देशाने वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्याला (अशा थेट मार्केटिंगशी संबंधित असलेल्या प्रोफायलिंग सहित) कोणत्याही वेळी व कायदेशीर आधार सांगायला न लागता आक्षेप घेणे.

CORNING त्यांच्याबाबत परिरक्षित करते त्या वैयक्तिक डेटात प्रवेश, दुरुस्ती व काढून टाकणे, तसेच वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे थांबवणे व प्रक्रिया करण्यावर निर्बंध घालणे वा डेटा पोर्टेबलिटी प्राप्त करणे यांचे हक्क डेटा विषयव्यक्तीला पुरवण्यासंबंधी भूमिका व जबाबदाऱ्या यांचे वर्णन करण्यासाठी प्रक्रिया CORNING मध्ये स्थापित आहे.

डेटा विषयव्यक्ती त्यांच्या विनंत्या privacy@corning.com येथे, स्थानिक पातळीवर एकतर नियुक्त डेटा संरक्षण अधिकारी ("ADPO") वा स्थानिक गोपनीयता संपर्क ("LPC"), किंवा पोस्टल मेल, वैयक्तिकरित्या, दूरध्वनीद्वारा वा ईमेलद्वारा अन्य व्यवसाय कार्य प्रतिनिधीला सादर करू शकतात.

कोणत्याही विनंतीला उत्तर देण्यास CORNING ला सक्षम करण्यासाठी डेटा विषयव्यक्तींनी खालील आवश्यक ओळख डेटा संप्रेषित करणे आवश्यक आहे: नाव, आडनाव, ई-मेल पोष्टल पत्ता व त्यांची ओळख पटवण्यास आवश्यक अन्य माहिती.

उघडपणे अवास्तव असलेल्या, खासकरून त्यांची संख्या, किंवा त्यांचे पुनरावृत्ती होणारे घटक यांमुळे, अशा विनंत्यांना CORNING हरकत घेऊ शकेल.

**तक्रार दाखल करण्याचा हक्क.** Corning लागू वैयक्तिक डेटा संरक्षण नियमांचे अनुपालन करत नसल्याचा डेटा विषयव्यक्तीला संशय असल्यास पर्यवेक्षक प्राधीकरणाकडे तक्रार दाखल करण्याचा हक्कही डेटा विषयव्यक्तींना आहे.

## सुरक्षितता व गोपनीयता

CORNING ने ती गोळा करत असलेला व ठेवत असलेला वैयक्तिक डेटा गोपनीय ठेवण्यासाठी व अनधिकृत वा बेकायदेशीर प्रकटीकरण किंवा प्रवेश, अपघाती हानी, विध्वंस, बदल किंवा मोडतोड यांपासून त्याचे संरक्षण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व अंमलबजावणीचा खर्च लक्षात घेऊन सुयोग्य व वाणिज्यिकरित्या वास्तव असलेली तांत्रिक आणि संघटनात्मक सुरक्षा उपाय पावले उचलली आहेत. या उपाययोजनांचा उद्देश संरक्षित करण्याच्या वैयक्तिक डेटावरील प्रक्रिया व स्वरूप यांमधील अंगभूत जोखमींसंबंधात सुयोग्य पातळीच्या सुरक्षिततेची डेटा संरक्षणासंबंधीच्या लागू कायद्यांमधील सुरक्षितता आवश्यकतांशी सुसंगत रीतीने खात्री करणे हा आहे.

CORNING तिच्या ज्या पुरवठादारांना वैयक्तिक डेटासाठी प्रवेश दिला आहे त्यांची डेटा संरक्षण पद्धती किमान CORNING ने लागू केल्याइतकी कडक असल्याची खातरजमा करण्यासाठी सुयोग्य उपाययोजना करते.

## वैयक्तिक डेटा उल्लंघन नोटिफिकेशन्स

वैयक्तिक डेटा उल्लंघने[13] विशिष्ट परिस्थितींमध्ये सक्षम पर्यवेक्षक प्राधीकरणे व ग्रस्त डेटा विषयव्यक्तींसमोर नोटिफिकेशन रेजीमच्या अधीन आहेत.

या दायित्वाला प्रतिसाद देण्यासाठी पुरेसे मार्ग उपलब्ध आहेत याची खातरजमा CORNING करते. खासकरून, CORNING कर्मचाऱ्यांनी कोणतेही संशयित वा प्रत्यक्ष वैयक्तिक डेटा उल्लंघन (वैयक्तिक डेटा ज्यावर आहे ते उपकरण गहाळ वा चोरी होण्याच्या समावेशासहित) privacy@corning.com येथे वा संबंधित ADPO वा LPC यांना कळवले पाहिजे. Corning गोपनीयता कार्यालय मर्यादेबाहेर उशीराशिवाय संबंधित Corning भागधारकांसह वैयक्तिक डेटा उल्लंघने हाताळते.

## CORNING समुहांतर्गत वा बाहेरील वैयक्तिक डेटा हस्तांतरण

CORNING ही जागतिक संस्था आहे, जिचे जगभरात कायदेशीर प्रभाग आहेत, व सीमा पार करणारे व्यवसाय, आयटी प्रणाल्या, व्यवस्थापन संरचना व प्रक्रिया आहेत. असे असल्याने, CORNING ला अन्य CORNING प्रभाग, पुरवठादार, तृतीय पक्ष यांना, त्याच देशात वा तो सुरुवातीला पुरवला गेला त्या देशाव्यतिरिक्त अन्य देशांमध्ये, वैयक्तिक डेटा हस्तांतरित करणे व/वा अन्य देशांमध्ये होस्ट केले असू शकतात अशा डेटाबेसेसमध्ये वैयक्तिक डेटा साठवण्याची वरचेवर गरज असते. डेटा संरक्षणाच्या प्रभावी पातळया पुरवण्याच्या, खासकरून युरोपियन इकॉनॉमिक एरिया (EEA) बाहेरील CORNING प्रभागांकडे वैयक्तिक डेटा हस्तांतरणासंबंधी

[13] "वैयक्तिक डेटा उल्लंघन" याचा अर्थ सुरक्षितता उल्लंघन ज्यामुळे वहन केलेल्या, साठवलेल्या वा अन्यथा प्रक्रिया केलेल्या वैयक्तिक डेटाचा अपघाती वा अवैध विध्वंस, नुकसान, बदलाव, अनधिकृत परङ्मटीकरण वा तझ्यात अनधिकृत परङ्वेश असा असेल.

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

प्रयत्नांतर्गत, CORNING ने BCR या ईयू कायद्याने पुरवलेली तत्त्वे, नियम व साधनांच्या प्रणालीचा स्वीकार केला आहे. अजून विशिष्टपणे:

- <u>CORNING प्रभागांकडे हस्तांतरणे</u>: एका CORNING प्रभागाकडून अन्य CORNING प्रभागाकडे वैयक्तिक डेटाच्या हस्तांतरणाला फक्त तेव्हाच परवानगी दिली जाईल जेव्हा हस्तांतरण विशिष्ट व कायदेशीर व्यवसाय उद्देशावर आधारलेले असेल व प्राप्तकर्ता प्रभाग हे धोरण व BCR व हस्तांतरणाला व (त्यापुढील हस्तांतरणासहित) त्यानंतरच्या कोणत्याही प्रक्रिया करण्याला लागू असणारे कोणतेही अधिक कडक स्थानिक कायदे यांच्या अनुपालनाची खात्री देतील. BCR मध्ये पुरवल्यानुसार, जेव्हा एक CORNING प्रभाग त्याच्यातर्फे अन्य CORNING प्रभागाला वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्याची विनंती करते तेव्हा प्रक्रिया करण्याची विनंती प्राप्त करणाऱ्या CORNING प्रभागाने अशा प्रक्रियेसाठी असलेले तांत्रिक आणि संघटनात्मक सुरक्षा उपाय लागू करण्याची हमी देणारा अन्य CORNING प्रभाग निवडला पाहिजे व या उपायांचे अनुपालन करण्याची खातरजमा केली पाहिजे. BCR ने बंधित कोणताही CORNING प्रभाग प्रक्रियाकर्ता[14] म्हणून अन्य CORNING प्रभागाच्या वतीने काम करताना त्या पुरेशा हम्या पुरवण्याचे व BCR मध्ये असलेले सर्व सुरक्षितता उपाय पाळण्याचे, खासकरून वैयक्तिक डेटाचे हस्तांतरण करणाऱ्या CORNING प्रभागाने पुरवलेल्या सूचनांचे अनुपालन करण्याचे व वैयक्तिक डेटाचे अपघाती किंवा बेकायदेशीर विध्वंस किंवा अपघाती नुकसान, बदल, विनाअनुमती प्रकटीकरण किंवा प्रवेश यांपासून पुरेसे संरक्षण देण्यासाठी तांत्रिक आणि संघटनात्मक सुरक्षा उपाययोजना करण्याचे मान्य करते. त्या व्यतिरिक्त, हस्तांतरण एकत्रित नियंत्रक म्हणून कार्य करणाऱ्या दोन CORNING प्रभागांमध्ये होत असल्यास[15], GDPR अन्वये दायित्वे अनुपालन करण्याच्या, खासकरून डेटा विषयव्यक्तीच्या हक्कांचे कार्यान्वयन करण्यासंबंधीच्या, त्यांच्या संबंधित जबाबदाऱ्या निर्धारित करणारा लेखी करार अंतिम केला जाईल.

- <u>CORNING समूहाबाहेरील प्रभागांकडे हस्तांतरण:</u>

– <u>पुरवठादार</u>: CORNING ने पुरवठादारांशी लेखी करार केला किंवा करणार आहे ज्यायोगे ते CORNING च्या सूचनांबरहुकूम वैयक्तिक डेटा प्रक्रिया करतील, व सुयोग्य संरक्षण पातळीची खातरजमा करण्यासाठी सुयोग्य सुरक्षितता व गोपनीयता उपायांची संरचना व अनुरक्षण करतील. त्या व्यतिरिक्त, CORNING ला अशा पुरवठादारांकडून (i) या धोरणात असलेल्या मानकांशी किमान समकक्ष मानके लागू केल्याची व (ii) पुरवठादारांनी डेटा संरक्षणासंबंधीचा लागू कायद्यांचे, खासकरून वैयक्तिक डेटा हस्तांतरणासाठी व कोणत्याही त्यापुढील हस्तांतरणासाठी लागू असलेल्यांचे, अनुपालन केल्याच्या समाधानकारक ग्वाहीची आवश्यकता असेल. अशा पुरवठादारांना वैयक्तिक डेटामध्ये प्रवेश केवळ त्यांच्या लागू असलेल्या सेवा कंत्राटांमध्ये निर्धारित सेवा देण्यासाठीच्या उद्देशांसाठीच असेल. पुरवठादार या बंधनांची पूर्तता करत नाही असा निष्कर्ष एखाद्या CORNING प्रभागाने काढल्यास, ते शीघ्रतेने योग्य कारवाई करेल. आणखी, CORNING ईयू बाहेरील पुरवठादारांना तोपर्यंत वैयक्तिक डेटा हस्तांतरित करत नाही जोपर्यंत त्यांनी वैयक्तिक डेटाचे संरक्षण करण्यासाठी संबंधित ईयू डेटा संरक्षण आवश्यकतांनुसार सुयोग्य गोपनीयता व सुरक्षितता नियंत्रणे (उदाहरणार्थ जर ते अशा देशांमध्ये स्थित आहेत जो वैयक्तिक डेटाला पुरेशा पातळीचे संरक्षण पुरवत नसल्यास ईयू कमिशनने संमत केलेली ईयू प्रमाण कंत्राट कलमे पुरवठादाराने सही केली आहेत). त्या व्यतिरिक्त, एकत्र-नियंत्रक नात्यासाठी (असल्यास), Corning द्वारा कोणत्याही बाह्य एकत्र-नियंत्रकांशी GDPR अनुपालनानुसार लेखी करार अंतिम केला जाईल.

– <u>तृतीय पक्ष</u>: CORNING प्रभागांना विशिष्ट वैयक्तिक डेटा तृतीय पक्षांना उघड करणे आवश्यक असू शकते. खासकरून, असे प्रकटीकरण लागू कायद्यांचे अनुपालन करण्यासाठी (उदा., कर प्राधिकरणांकडे पगार डेटाचे प्रकटीकरण) किंवा जेव्हा डेटा विषयव्यक्तीचे आरोग्य किंवा सुरक्षितता धोक्यात आहे तेव्हा (उदा., अपघात घडतो तेव्हा) आवश्यक असू शकते. CORNING तिच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण करण्यासाठीही वैयक्तिक डेटा उघड करू शकेल (उदा., न्यायालयीन वादामध्ये).

**उत्तरदायित्व**

या धोरणात निर्धारित असलेली तत्त्वे अनुपालन केल्याचे निदर्शित करण्यासाठी CORNING ने खालील उपाय अमलात आणले आहेत:

*i) प्रक्रिया करण्याच्या कृतींच्या नोंदी*

[14] "प्रक्रियाकर्ता" याचा अर्थ नैसर्गिक वा कायदेशीर व्यक्ती, सार्वजनिक प्राधीकरण, एजन्सी वा अन्य कोणतीही बॉडी जी नियंत्रकाच्या वतीने वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करते असा असेल.
[15] दोन वा अधिक नियंत्रक जे एकत्रितपणे प्रक्रिया करण्याचे उद्देश वा साधने ठरवतात.

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

CORNING वैयक्तिक डेटाबाबत प्रक्रिया करण्याच्या कृतींच्या नोंदी राखते[16]. या नोंदी कोणत्याही सक्षम पर्यवेक्षक प्राधीकरणाला तपास करण्याच्या उद्देशाने उपलब्ध असल्या पाहिजेत.

*ii) रचनेअन्वये व पूर्वनिर्धारितपणे डेटा संरक्षण*

साधने ठरवताना व प्रक्रिया करताना या दोन्ही वेळी डेटा संरक्षण आवश्यकतांची पूर्तता करणे व डेटा विषयव्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करणे यासाठी CORNING ने डेटा संरक्षण तत्त्वे प्रभावी पद्धतीने अमलात आणण्यासाठी सुयोग्य तांत्रिक व संस्थात्मक उपाय अमलात आणले पाहिजेत व प्रक्रिया करण्यात आवश्यक सुरक्षा उपाय एकात्मिक केले पाहिजेत.

त्या व्यतिरिक्त, प्रक्रिया करण्याच्या प्रत्येक विशिष्ट उद्देशासाठी आवश्यक तितकाच वैयक्तिक डेटा प्रक्रिया केला जाईल याची, पूर्वनिर्धारितपणे, खात्री करण्यासाठी CORNING ने सुयोग्य तांत्रिक व संस्थात्मक उपाय अमलात आणले पाहिजेत. हा नियम संग्रहित केलेला एकूण वैयक्तिक डेटा, त्यांचा साठवण कालावधी व त्यांमध्ये प्रवेश प्राप्ती यांना लागू होतो.

*iii) डेटा संरक्षण प्रभाव मूल्यांकने*

प्रक्रिया करण्याने डेटा विषयव्यक्तींचे हक्क व स्वातंत्र्ये यांना उच्च जोखीम असू शकते तेंव्हा CORNING डेटा संरक्षण प्रभाव मूल्यांकने (वा डीपीआयए) करते[17]. प्रक्रिया करण्याने डेटा विषयव्यक्तींचे हक्क व स्वातंत्र्ये यांच्यावर पडू शकणारा प्रभाव ओळखण्यासाठी डीपीआयए प्रक्रिया करण्याच्या कृतींचे मूल्यांकन करते व त्या प्रभावाचे व्यवस्थापन करण्यासाठी शिफारशी देते.

## V. या धोरणाचे अनुपालन करण्यासाठी बांधिलकी व अमलात आणलेली साधने

CORNING ने जागतिक प्रमुख गोपनीयता अधिकारी ("GCPO"), प्रादेशिक डेटा गोपनीयता व्यवस्थापक, नियुक्त डेटा संरक्षण अधिकारी (GDPR व/वा डेटा संरक्षणासंबंधीचा लागू कायद्यान्वये आवश्यक तेथे), व स्थानिक गोपनीयता संपर्क यांनी बनलेले CORNING गोपनीयता कार्यालय ("CPO") स्थापित केले आहे. या धोरणाचे व BCR चे अनुपालन तसेच हे धोरण व BCR आणि संबंधित धोरणे व प्रक्रिया यांकरिता आवश्यक असलेली कोणतीही उत्क्रांती सुरू व समन्वयित करण्यास CORNING समूह पातळीवर CPO जबाबदार आहे. CORNING या धोरणाशी सुसंगतता तपासण्यासाठी व CORNING प्रभाग व कर्मचारी प्रक्रिया करत असलेल्या वैयक्तिक डेटावर लागू होणारे , कायदे, आवश्यकता व कंत्राट करार यांच्या अनुपालनाची खात्री करण्यास मदत करणारे कार्यक्रमही वेळोवेळी परिरक्षित करते.

आमचे धोरण व BCR बिनचूक, सर्वसमावेशक, ठळकपणे प्रदर्शित, संपूर्णपणे कार्यान्वयित व उपलब्ध असल्याची तपासणी करण्यास CORNING ला सक्षम करणारे वेळोवेळचे कार्यक्रम व लेखापरिक्षणे अशा कार्यक्रमात समाविष्ट असतात.

डेटा संरक्षण समस्यांबाबत कर्मचारी जाणीव वाढवण्यासाठी Corning ने प्रशिक्षण कार्यक्रम अमलात आणला आहे. वैयक्तिक डेटा गोळा करणे, त्यावर प्रक्रिया करणे किंवा तो पाहणे हे करणाऱ्या नव्या किंवा प्रासंगिक कर्मचाऱ्यांना एक डेटा संरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करणे अनिवार्य राहील. याशिवाय, वैयक्तिक डेटा गोळा करणे, त्यावर प्रक्रिया करणे किंवा तो पाहणे हे करणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांना नियमितपणे असा एक कार्यक्रम पूर्ण करावा लागेल.

त्या व्यतिरिक्त, हे धोरण, BCR व सर्व संबंधित धोरणे, कार्यपद्धती वा मार्गदर्शक तत्त्वे अद्ययावत व लागू केली जाण्याची खात्री करण्यासाठी डेटा संरक्षण अनुपालन आढावे अंतर्गत वा बाह्य पथकांतर्फे नियमीतपणे घेतले जातील.

## VI. दावे हाताळणी व अंमलबजावणी यंत्रणा

ही धोरणे व BCR यांच्याशी सुसंगत नसलेल्या कोणत्याही प्रकारे वैयक्तिक डेटात प्रवेश, प्रक्रिया किंवा वापर झाल्यास, CORNING प्रभाग सुयोग्य उपाययोजक कृती करतील, ज्यात लागू कायद्यांनुसार शिस्तभंग निर्बंधांचा समावेश असू शकेल.

डेटा विषयव्यक्तीला असा विश्वास असेल की BCR वा या धोरणाचे उल्लंघन झाले आहे ज्यात BCR किंवा या धोरणाशी विसंगत प्रकारे त्याचा वैयक्तिक डेटा प्रक्रिया केला गेला, तर खाली वर्णन केल्यानुसार डेटा विषयव्यक्ती तक्रार करू शकतो.

डेटा विषयव्यक्तीकडून प्राप्त डेटा संरक्षण तक्रारींची हाताळणी व डेटा संरक्षण तक्रारींची नोंद, तपास व प्रतिसाद यांसंबंधी भूमिका व जबाबदाऱ्या यांचे वर्णन करण्यासाठी कार्यपद्धती CORNING मध्ये स्थापित आहे.

[16] GDPRचे कलम 30 पाहा.

[17] GDPRचे कलम 35.

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

Corning.com वर डेटा विषयव्यक्तीच्या तक्रारी देण्यासाठी योग्य ती टूल्स आहेत ज्यांमध्ये खालीलपैकी किमान एकाचा समावेश आहे:

- तक्रार फॉर्मसाठी वेब लिंक,
- ईमेल पत्ता, टेलिफोन क्रमांक, वा पोस्टल पत्ता.

## कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या डेटा संरक्षण तक्रारी

CORNING कर्मचारी त्यांच्या डेटा संरक्षण तक्रारी CORNING चे इन्ट्रानेट व CORNING वेबसाईटवरील बाह्य फेसिंगवर उपलब्ध डेटा संरक्षण तक्रार फॉर्मद्वारा सादर करू शकतात. डेटा संरक्षण तक्रार फॉर्म पूर्ण केल्यानंतर, तो फॉर्म खालील पद्धतींनी सबमिट करता येऊ शकेल:

- CPO मेलबॉक्स, privacy@corning.com ला ईमेल
- ईमेल, पोस्टल मेल, वा नियुक्त डेटा संरक्षण अधिकारी वा स्थानिक गोपनीयता संपर्क वा एचआर, विक्री, मार्केटिंग, जागतिक पुरवठा व्यवस्थापन आणि आरोग्य व सुरक्षितता खाती तसेच अन्य कोणतीही आवश्यक व्यवसाय कार्ये यांच्याकडे व्यक्तिगतरित्या पोचवणे

### अन्य डेटा विषयव्यक्ती (उदा., हंगामी कामगार, पुरवठादार, ग्राहक) यांनी सादर केलेल्या डेटा संरक्षण तक्रारी

अन्य डेटा विषयव्यक्ती गोपनीयता तक्रारी CORNING वेबसाईटवरील बाह्य फेसिंगवर उपलब्ध गोपनीयता तक्रार फॉर्मद्वारे सादर करू शकतात. डेटा संरक्षण तक्रार फॉर्म पूर्ण केल्यानंतर, तो फॉर्म खालील पद्धतींनी सबमिट करता येऊ शकेल:

- ईमेल, पोस्टल मेल, वा नियुक्त डेटा संरक्षण अधिकारी वा स्थानिक गोपनीयता संपर्क, ग्राहक सेवा प्रतिनिधी, GSM प्रतिनिधी वा विक्री व मार्केटिंग प्रतिनिधी यांच्याकडे व्यक्तिगतरित्या पोचवणे
- CPO मेलबॉक्स, privacy@corning.com ला ईमेल

तक्रार नोंदली जाते, तेव्हा तिची पोचपावती दिली जाते व वास्तव कालावधीत (म्हणजे विनंती प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत, गुंतागुंत व विनंत्यांची संख्या विचारात घेऊन आवश्यक तेथे आणखी दोन महिने वाढवून) ती हाताळली जाते. असे वाढवणे लागू असल्यास CORNING त्याबाबत डेटा विषयव्यक्तीला कळवेल.

डेटा विषयव्यक्ती Corning च्या उत्तरांनी समाधानी नसेल, वा डेटा विषयव्यक्तीला उपलब्ध अंतर्गत तक्रार यंत्रणा टाळणे पसंत असेल, तर संबंधित पर्यवेक्षक प्राधीकरणाकडे तक्रार दाखल करण्याचा[18] व/वा सक्षम न्यायक्षेत्र अधिकाऱ्याकडे दाद मागण्याचा डेटा विषयव्यक्तीला अधिकार आहे[19].

## VII. CORNING संपर्क बिंदू

हे धोरण, वा कोणत्याही तक्रारी, विनंत्या (प्रवेश, आक्षेप वा दुरुस्ती विनंत्या) यांवरील कोणत्याही प्रश्नांसाठी, CPOशी येथे संपर्क साधण्यासाठी आम्ही तुम्हाला उत्तेजन देतो:

Corning Privacy Office
One Riverfront Plaza
MP-HQ-01-E1E26A
Corning, NY 14831
(607) 974-9000

Privacy@corning.com

[18] GDPR लागू आहे तेथे, डेटा विषयव्यक्तीच्या सवयीच्या निवासाच्या ईयू सदस्य राज्यात, त्याच्या कामाच्या ठिकाणी वा कथित उल्लंघनाच्या ठिकाणी.
[19] GDPR लागू आहे तेथे, स्थानिक डेटा नियंत्रकाची आस्थापना असलेल्या वा डेटा विषयव्यक्तीच्या सवयीच्या निवासाच्या सदस्य राज्याच्या न्यायालयात.

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

तुम्ही CORNING कर्मचारी असल्यास, तुम्ही तुमच्या स्थानाच्या वा डिव्हिजनच्या नियुक्त डेटा संरक्षण अधिकारी (असल्यास) वा वा एचआर निर्देशित संपर्काशीही संपर्क साधू शकता.

## VIII. सुधारणा

या धोरणात वेळोवेळी सुधारणा होऊ शकते. या धोरणाची नवीनतम आवृत्ती इन्ट्रानेट व बाह्य वेबसाईटवर पोस्ट केली जाईल व योग्य असल्यानुसार कर्मचाऱ्यांना वितरितही (हार्ड कॉपी वा इलेक्ट्रॉनिक आवृत्ती) केली जाऊ शकेल.

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.